'द न्यूज बिज टाईम्स'

दि. ५/९/२०२६ पिंपरी, महाराष्ट्र, thenewzbiz@gmail.com वर्ष – दुसरे डिजीटल आवृती

# माझा डेटा, माझी जबाबदारी – सायबर वॉरियर्सकडून पिंपळे सौदागरमधील विद्यार्थ्यांना डिजिटल सुरक्षिततेचे धडे !

**पिंपळे सौदागर, प्रतिनिधी :**

पिंपळे सौदागर येथील अण्णासाहेब मगर माध्यमिक विद्यालयात डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या क्विक हिल फाउंडेशन फायबर वॉरियर क्लबतर्फे सायबर जनजागृती सत्र उत्साहात संपन्न झाले. हा उपक्रम सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या मोहिमेअंतर्गत तसेच माय डाटा, माय रिस्पॉन्सिबीलिटी या वार्षिक थीमनुसार आयोजित करण्यात आला होता.

सायबर वॉरियर्स शिवांगी शुक्ला आणि कृतिका पटेल यांनी या सत्रादरम्यान २५० हून अधिक विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग राहील अशा अत्यंत संवादात्मक पद्धतीने हे सत्र घेण्यात आले. तरुण विद्यार्थ्यांचा स्मार्टफोन आणि इंटरनेटचा वाढता वापर लक्षात घेऊन, या सत्रामध्ये ऑनलाइन सुरक्षितता, डीपफेक, सायबरबुलिंग, ॲप परवानग्या, पासवर्ड सुरक्षा, ज्यूस जॅकिंग, सिम स्वॅप, विशिंग आणि सुरक्षित ऑनलाइन वर्तन याबाबत व्यावहारिक माहिती देण्यात आली. वास्तविक आणि डिजिटल जगातील फरक फळा आणि डिजिटल बोर्डाच्या सोप्या उदाहरणाद्वारे समजावून सांगण्यात आला. प्रत्यक्ष जीवनातील घटनांवर आधारित प्रात्यक्षिकांमधून विद्यार्थ्यांना विविध जोखीम समजावून सांगण्यात आल्या. त्यानंतर विद्यार्थ्यांची समज तपासण्यासाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सायबर हेल्पलाइन क्रमांक १९३० आणि नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टींग पोर्टल (cybercrime.gov.in) याबाबतही माहिती देण्यात आली.



मुख्याध्यापक बुधा नाडेकर आणि शाळेतील कर्मचारी अरविंद कांबळे यांचे सहकार्य मिळाले. शिक्षकांनी हे सत्र अत्यंत माहितीपूर्ण, संवादात्मक आणि विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनीही या सत्राचा मनापासून आनंद घेतल्याचे आणि नवीन ज्ञान मिळाल्याचे सांगितले. हा उपक्रम डॉ. रंजित पाटील, प्राचार्य, डॉ. डी. वाय. पाटील –उड महाविद्यालय आणि प्रा. सत्यवान कुंजीर, महाविद्यालयीन समन्वयक यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडला. क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा कटकर यांचे प्रोत्साहन मिळाले.